नवरात्रोत्सव व घटस्थापनेच्या मंगलमय शुभेच्छा !
कॅमल®
सुपरफाईन शाबुदाणा
उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच
1 kg | 500gm | 250gm
सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काजळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २७१। किंमत - २ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - डॉ. सुदीप किसन हासे (एम.ई. पीएच. डी.) | शनिवार ०७/११/२०२६ पाने - ४

फराळ, फटाके जिकडे तिकडे.
दिवाळी म्हणजे राजेन्द्रचे कपडे
दिवाळी आली, चला 'राजेन्द्र'मध्ये!
खास दिवाळीसाठी असंख्य व्हरायटीज.
१९५९ पासून राजेन्द्र
क्लॉथ स्टोअर्स
मेन रोड, संगमनेर.
फोन : 02425-225740, 79010 31155

राजहंस दूध संघातर्फे दिपावलीनिमित्त पन्नास कोटी रूपये बँकेत वर्ग

दरवर्षीप्रमाणे दीपावलीच्या निमित्ताने अमृत उद्योग समूहातील विविध सहकारी संस्थांनी सभासद शेतकरी उत्पादक कामगार यांचे विविध देयके बँकेत वर्ग केले आहे. यामुळे सभासद शेतकरी व नागरिक यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून हा सर्व पैसा बाजारपेठेत येणार असल्याने शहरातील व्यापारी आनंदी झाला आहे. यामुळे तालुक्यातील सर्व नागरिकांची दिवाळी गोड होणार असल्याने सर्व दूध उत्पादक कामगार शेतकरी यांनी दूध संघाचे अभिनंदन केले आहे.



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मा.महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुक्यातील दूध उत्पादकांच्या जीवनात दुग्ध व्यवसायाच्या माध्यमातून आर्थिक स्थिरता निर्माण झाली आहे. याचबरोबर सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत झाली आहे. ग्रामीण भागात दुग्धव्यवसाय हा शेतीला पुरक व्यवसाय न राहता मुख्य व्यवसाय बनला आहे. दूध संघाच्या माध्यमातून दिपावलीनिमित्त दूध दर फरक, दुधाचे पेमेंट, अनामत, कामगारांना बोनस व मेहनताना, चढ-उतार निधी इत्यादी बाबींसाठी दूध उत्पादकांना सुमारे ५० कोटी रूपये अदा करण्यात आले असल्याची माहिती दूध संघाचे माजी चेअरमन व जिल्हा बँकेचे संचालक मा.रणजितसिंह देशमुख यांनी दिली.

दीपावलीच्या पार्श्वभूमीवर दूध संघाच्या वतीने वर्ग करण्यात आलेल्या पेमेंट बाबत माहिती देताना ते पुढे म्हणाले की, थोर स्वातंत्र्यसेनानी सहकारमहर्षी स्व.भाऊसाहेब थोरात यांनी सन १९७७ साली दूध संघाची स्थापना केली. त्यांच्या आदर्श विचारावर दूध संघाची यशस्वी वाटचाल चालू आहे. माजी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली दूध उत्पादकांच्या हिताची सातत्यपुर्ण काळजी घेतली जात असून दूध उत्पादकांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचे काम केले जात आहे. मिशन ५० ङ च्या माध्यमातून ५० लिटर दुधाच्या गाई निर्माण करण्याचे महत्वकांक्षी उद्दिष्ट ठेवले आहे. त्या माध्यमातून दुग्धव्यवसायात क्रांती निर्माण होणार आहे. नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून दुग्धव्यवसायाला फायदेशीर ठरतील असेच निर्णय घेतले जातात. संघाने नेहमी दूध उत्पादकांच्या हिताचे निर्णय घेतले आहे. संगमनेर दूध संघाची वार्षिक उलाढाल ६०९ कोटी असून दूध उत्पादकांना वर्षभरामध्ये सुमारे ५०० कोटी रूपये दूध खरेदी पोटी दिले जातात. दुग्ध व्यवसायाच्या माध्यमातून नियमितपणे १५ दिवसाला पेमेंट होत असल्याने त्यातून दूध उत्पादकांचे व्यवस्थीतपणे अर्थकारण चालू असते. दिवाळीच्या निमित्ताने येणाऱ्या रक्कमेमुळे मोठ्या प्रमाणावर बाजारपेठेत उलाढाल होत असते.

ग्रामिण भागातील होणाऱ्या या अर्थकारणावर शहराची अर्थव्यवस्था अवलंबून आहे. दूध उत्पादकांकडील रक्कम ही शहरातील व्यापाऱ्यांकडे विविध प्रकारच्या खरेदीच्या माध्यमातून हस्तांतरीत होत असते. त्यामुळे संपुर्ण तालुक्याचीच अर्थव्यवस्था मजबूत झाली आहे. तालुक्यातील सहकारी संस्थांमुळे संगमनेरची बाजारपेठ ही जिल्ह्यात मोठी बाजारपेठ बनलेली आहे. (पान २)

ओबीसींच्या हक्कांवर सर्वोच्च न्यायालयाचा शिक्कामोर्तब
क्रिमिलियर ठरवताना पगार आणि शेतीचे उत्पन्न ग्राह्य नाही



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजाच्या आरक्षणाच्या लढ्याला मोठे बळ देणारा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. ओबीसींच्या क्रिमिलियर (संपन्न स्तर) निश्चित करण्यासाठी आई-वडिलांचे वेतन किंवा शेतीतून मिळणारे उत्पन्न हा एकमेव आधार मानता येणार नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. या निर्णयामुळे गेल्या अनेक वर्षांपासून क्रिमिलियरच्या निकषांमुळे अन्याय झाल्याची तक्रार करणाऱ्या ओबीसी उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे. विशेष म्हणजे, केंद्र सरकारने दाखल केलेली पुनर्विचार याचिकाही सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नरसिम्हा आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. यापूर्वी ११ मार्च रोजी दिलेल्या निर्णयातील भूमिका कायम ठेवताना न्यायालयाने क्रिमिलियर निश्चित करण्याच्या प्रक्रियेत वेतन आणि शेतीच्या उत्पन्नाबाबत स्पष्ट भूमिका मांडली. केवळ आई-वडिलांच्या पगाराच्या किंवा शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या आधारे ओबीसी उमेदवारांना क्रिमिलियर ठरवून आरक्षणाच्या लाभापासून वंचित ठेवता येणार नाही, असे न्यायालयाच्या निर्णयातून स्पष्ट झाले आहे.

या निर्णयाचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण होऊनही क्रिमिलियरच्या निकषांच्या आधारे नियुक्तीपासून वंचित राहिलेल्या आयएएस, आयपीएस आणि आयआरएस पदांच्या पात्र उमेदवारांचा प्रश्न. अशा उमेदवारांना नियुक्ती देण्याचे आदेशही सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिले आहेत. त्यामुळे कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाकडून (डेझाद) नियुक्ती रोखण्यात आलेल्या संबंधित उमेदवारांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

गेल्या दशकभरापासून क्रिमिलियरच्या व्याख्येवरून ओबीसी समाजात असंतोष होता. वेतन आणि शेतीच्या उत्पन्नाचा चुकीच्या पद्धतीने विचार करून अनेक पात्र उमेदवारांना आरक्षणाच्या लाभापासून दूर ठेवले जात असल्याची भूमिका याचिकाकर्त्यांनी मांडली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयामुळे या मुद्द्यावर महत्त्वपूर्ण स्पष्टता निर्माण झाली आहे.

या प्रकरणातील तक्रारदारांचे वकील शशांक रत्नू यांनी या निर्णयाचे स्वागत करताना हा ओबीसी समाजाचा मोठा विजय असल्याचे म्हटले आहे. गेल्या एक दशकापासून ओबीसी समाजावर अन्याय होत होता. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे तो दूर होण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

एकूणच, क्रिमिलियरच्या निकषांबाबत सर्वोच्च न्यायालयाने घेतलेली ठाम भूमिका ओबीसी आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. केंद्र सरकारची पुनर्विचार याचिका फेटाळल्यामुळे या निर्णयाला अधिक बळ मिळाले असून, पात्र ओबीसी उमेदवारांच्या न्याय्य हक्कांच्या लढ्याला मोठे यश मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

मुळचंद
आता आपल्या संगमनेरमध्ये
होलसेल मिल डेपो
डायरेक्ट मिल ते ग्राहक
लेडीज विअर
साडी सेक्शन
यंदाची दिवाळी मुळचंदसोबतच
मो. 7498901766
हॉटेल सेलिब्रेशन समोर, अकोले रोड, संगमनेर

दिपावली धमाका ऑफर
दागिन्यांच्या मजुरीवर
25% सूट
ऑफर कालावधी : 5 ते 30 नोव्हेंबर 2026
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्स
मेनरोड, राजेंद्र क्लॉथ समोर, संगमनेर ☎ ०२४२५ - २२३८६२ ७५८८२ ४९८४९

गोकुळमध्ये रडीचा डाव आणि बाहेर लोकशाही वाचवा मोर्चे - राज ठाकरे



मुंबई (वृत्तसंस्था)

कोल्हापूरच्या 'गोकुळ दूध संघा'च्या निवडणुकीतील राज्य सरकारच्या हस्तक्षेपावरून आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भारतीय जनता पक्षावर अत्यंत सडकून टीका केली आहे. खालपासून वरपर्यंत सत्तेत असूनही 'लोकशाही वाचवा' म्हणून मोर्चे काढणारा भाजप हा जगातील एक अजब पक्ष आहे, असा टोला लगावतानाच राज ठाकरे यांनी गोकुळमधील भाजपच्या 'रडीच्या डावा'चे वाभाडे काढले आहेत.

गोकुळ दूध संघात सतेज पाटील यांच्या पॅनेलला मिळालेल्या बहुमताचा संदर्भ देत राज ठाकरे यांनी भाजपच्या 'लोकशाही वाचवा' भूमिकेवर थेट प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले, लोकशाहीची बूज राखायची खरोखर इतकी इच्छा असेल, तर गोकुळ प्रकरणात सतेज पाटील पॅनेलचे १३ जण आणि तुमच्या भाजप पॅनेलचे १२ जण निवडून आल्यावर, लगेच तुम्ही सरकारचे ५ संचालक का नेमले? त्यांना मतदानाचा अधिकार देऊन तुम्ही काय सिद्ध करताय? सतेज पाटील यांच्या पॅनेलचे संचालक बॅलेट पद्धतीने आणि लोकशाही मार्गाने निवडून आले आहेत. तुम्हाला खरंच लोकशाहीची पर्वा असती, तर हा असला प्रकार तुम्ही केला नसता. राज ठाकरे यांनी आपल्या खास शैलीत भाजपला चिमटा काढत म्हटले की, (पान ३)

सणासुदीत
सोन्याची खरेदी, बचतीची पर्वणी!
दिवाळी धमाका!
सर्व सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर
50%* पर्यंत सूट
११ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२६
कमी दराच्या खात्रीसोबत मिळवा जबरदस्त ऑफर्स.....!
ॲडव्हान्स बुकिंगनंतर सोन्याचा दर कमी झाल्यास, खरेदीच्या वेळी असलेल्या कमी दरानेच सोने खरेदी करता येईल.
सर्वात कमी भाव
ओम मयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने घ्यावे
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
02425-225924 | 937201 2044

राजपाल
खरेदी करा आणि जिंका
41 दिवस 11 लाखांची बक्षिसे
11 ऑक्टोबर - 20 नोव्हेंबर
₹11 लाखांची 1111 बक्षिसे
जिंकण्याची संधी...

दिवाळी पाडवा निमित्त
सोने खरेदीची उत्तम संधी
आता मजुरी फक्त 4% पासुन सुरुवात
मे. पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

संपादकीय...

महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अजूनही अनुत्तरित!

समाज कितीही प्रगत झाला, विज्ञान-तंत्रज्ञानाने कितीही मोठी झेप घेतली, महिला शिक्षण, उद्योग, राजकारण, क्रीडा आणि प्रशासन अशा प्रत्येक क्षेत्रात आपली क्षमता सिद्ध करीत असल्या, तरी त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आजही कायम आहे. एकीकडे महिला सक्षमीकरणाच्या घोषणा दिल्या जातात, तर दुसरीकडे महिलांवरील अत्याचार, विनयभंग, छेडछाड, कौटुंबिक हिंसाचार आणि सायबर गुन्ह्यांच्या घटना समोर येत आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थाने महिला सुरक्षित आहेत का, हा प्रश्न पुन्हा पुन्हा उपस्थित होतो. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न केवळ कायदा आणि सुव्यवस्थेपुरता मर्यादित नाही. तो आपल्या सामाजिक मानसिकतेशी, संस्कारांशी आणि व्यवस्थेच्या कार्यक्षमतेशी जोडलेला आहे. मुलगी घराबाहेर पडताना तिच्या वेळेची, कपड्यांची, प्रवासाची आणि सोबत कोण आहे याची चिंता कुटुंबीयांना वाटते. रात्री उशिरा कामावरून घरी परतणाऱ्या महिलांना सुरक्षित प्रवासाची खात्री नसते. शिक्षणासाठी किंवा नोकरीसाठी शहरात जाणाऱ्या तरुणींनाही अनेकदा असुरक्षिततेचा सामना करावा लागतो. ही परिस्थिती बदलणे ही केवळ सरकारची नव्हे, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी कठोर कायदे अस्तित्वात आहेत. विविध कायद्यांद्वारे अत्याचार करणाऱ्यांना शिक्षा करण्याची तरतूदही आहे. मात्र, कायदे कितीही कठोर असले तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नसेल, तर त्यांचा अपेक्षित परिणाम साध्य होत नाही. अनेक प्रकरणांमध्ये तक्रार नोंदविण्यापासून ते न्याय मिळेपर्यंत महिलांना मानसिक आणि सामाजिक संघर्ष करावा लागतो. न्यायप्रक्रियेतील विलंब, तपासातील त्रुटी आणि पीडितेला मिळणारी असंवेदनशील वागणूक यामुळे अन्याय सहन करण्याची वेळ येते. त्यामुळे तक्रारीची तातडीने दखल घेणे, निष्पक्ष तपास करणे आणि पीडितेला संरक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. आजच्या डिजिटल युगात महिलांच्या सुरक्षेचे आव्हान अधिक व्यापक झाले आहे. सोशल मीडिया, बनावट खाती, ऑनलाइन छळ, फोटोचा गैरवापर, धमक्या आणि सायबर ब्लॅकमेलिंग यांसारख्या प्रकारांमध्ये वाढ होत आहे. विशेषतः अल्पवयीन मुली आणि तरुणींना या धोक्यांची जाणीव करून देण्यासाठी शाळा, महाविद्यालये आणि पालकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. डिजिटल साक्षरतेसोबतच सायबर गुन्ह्यांविरोधात तक्रार करण्याचे धैर्यही निर्माण झाले पाहिजे. यासाठी प्रत्येक शहरात आणि गावात सुरक्षित सार्वजनिक व्यवस्था उभी करणे आवश्यक आहे. रस्त्यांवरील पुरेशी प्रकाशव्यवस्था, सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही, नियमित पोलीस गस्त, सुरक्षित सार्वजनिक वाहतूक आणि तक्रार निवारण यंत्रणा सक्षम झाली पाहिजे. मात्र, यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे पुरुषांच्या मानसिकतेत बदल घडविणे. महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलल्याशिवाय सुरक्षित समाजाची निर्मिती होऊ शकत नाही. मुलांना लहानपणापासून स्त्री-पुरुष समानता, परस्पर आदर आणि व्यक्तिस्वातंत्र्याचे संस्कार देणे आवश्यक आहे. महिलांना सुरक्षिततेसाठी सतत स्वतःवर बंधने घालावी लागतात, हीच आपल्या समाजव्यवस्थेची मोठी शोकांतिका आहे. महिलांनी निर्भयपणे शिक्षण घ्यावे, नोकरी करावी, व्यवसाय करावा आणि रात्री-अपरात्रीही सुरक्षितपणे प्रवास करावा, अशी परिस्थिती निर्माण होणे हीच खरी प्रगती आहे. महिला दिन, महिला सक्षमीकरणाच्या घोषणा आणि विविध योजनांपेक्षा महिलांना प्रत्यक्ष सुरक्षिततेची हमी देणे अधिक महत्त्वाचे आहे.

दीपावलीनिमित्त प्रितेश-प्रियांश यांनी साकारला आकर्षक मातीचा किल्ला



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - दीपावलीच्या सणानिमित्त लहानग्यांमध्ये किल्ले बनविण्याची परंपरा आजही उत्साहाने जपली जात आहे. संगमनेर येथील विजय नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन पराग सराफ यांचे चिरंजीव प्रितेश आणि प्रियांश या बालगोपाळांनी दीपावलीनिमित्त आकर्षक किल्ल्याची निर्मिती केली आहे.

किल्ल्यांच्या निर्मितीतून छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रमी इतिहास, स्वराज्याची प्रेरणा आणि गड-किल्ल्यांचे महत्त्व बालमनावर रुजवले जाते. प्रितेश आणि प्रियांश यांनी आपल्या कल्पकतेतून साकारलेला हा किल्ला केवळ दीपावलीची सजावट नसून, शिवशौर्याबद्दलची आस्था, ऐतिहासिक वारशाचे जतन आणि संस्कृतीप्रती असलेली भावना व्यक्त करणारा आहे.

किल्ले बनविताना मुलांमध्ये सर्जनशीलता, कल्पनाशक्ती, नियोजन आणि ऐतिहासिक जाणिवा विकसित होतात. अशा उपक्रमांतून बालपिढीला आपल्या गौरवशाली इतिहासाची ओळख मिळत असून, दीपावलीचा आनंद अधिक अर्थपूर्ण होत आहे. प्रितेश आणि प्रियांश यांच्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

जि.प. प्राथ. शाळा पाडोशीत साकारला विहंगम मातीचा किल्ला



अकोले - दीपोत्सावाच्या आनंदी वातावरणात अकोले तालुक्यातील दुर्गम अशा जिल्हा परिषद प्राथ . शाळा पाडोशीत विद्यार्थांच्या उत्स्फूर्त सहभागातून भव्य व विहंगम मातीचा किल्ला बनविण्यात आला . विद्यार्थांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी दुर्गम आदिवासी भागात शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राच्या दैदिप्यमान ऐतिहासिक वारशाची ओळख जपण्यासाठी मातीपासून किल्ले बनविण्याचा नाविन्यपूर्ण उपक्रम अंत्यत उत्साहात पार पडला .

शिवछत्रपतींच्या गड-कोट किल्ल्यांचे महत्व विद्यार्थांना समजावे, त्यांच्यात ऐतिहासिक मूल्यांची रुजवण व्हावी आणि संघटितपणे कार्य करण्याची सवय लागावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . विद्यार्थांनी स्वतः माती मळून विवीध बुरुज तटबंदी , मुख्य प्रवेशद्वार आणि पायऱ्या अंत्यत कुशलतेने साकारल्या या सुंदर किल्लावर आकर्षक रंगकाम, भगवे झेंडे आणि सायंकाळच्या वेळी लावलेल्या पणत्यांमुळे किल्लाचे सौंदर्य अधिकच खुलून दिसत होते . सदर विद्यार्थांना मुख्याध्यापक भास्कर गावंडे , बहिरु साबळे , सुवर्णा जाधव , वंदना तळपाडे यांचे मार्गदर्शन लाभले

'यमुनाकाठ' दिवाळी अंकाचे शानदार प्रकाशन



यमुनाकाठ' या मराठी दिवाळी अंकाचे प्रकाशन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजयाताई रहाटकर यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे मोठ्या थाटात पार पडले. यावेळी अतिरिक्त सचिव शिक्षण मंत्रालय आनंद पाटील, महाराष्ट्र सधनाचे गुंतवणूक आयुक्त सुशील गायकवाड, ज्येष्ठ पत्रकार विजय नाईक, बीबीसी मराठीचे संपादक अभिजीत कांबळे हे उपस्थित होते. या मान्यवरांनी यमुनाकाठ दिवाळी अंकाचे कौतुक करीत शुभेच्छा दिल्या. या अंकासाठी ॲड. प्राची गवांदे, प्रशांत वाघाये, अजिंक्य बनसोडे आणि त्यांच्या टीमने परिश्रम घेतले.

- : जाहीर समन्स नोटीस :-

राष्ट्रसंत आचार्य आनंद ऋषीजी महाराज नागरी सहकारी पतसंस्था मर्या.संगमनेर, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर या संस्थेने दाखल केलेले दाव्यातील कर्जदार यांना दिनांक १५/१०/२०२६ रोजी या कार्यालयाकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०० (२) अन्वये नोटीस देण्यात येवुन दिनांक ३/११/२०२६ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतु खालील इसम सुनावणीस उपस्थित न राहील्याने त्यांना खालीलप्रमाणे जाहिर समन्स देण्यात येत आहे.

अ.क्र.	कर्जदाराचे नांव	गांवाचे नाव	मालमत्तेचे वर्णन	
			गट नंबर	क्षेत्र
१	श्री.अय्याज रज्जाकभाई शेख, रा.सय्यदबाबा चौक, संगमनेर	आंबीखालसा	५०३/२	०.०२ आर ख.०.०६
		खंदरमाळवाडी	२८/२	०.००.५० आर
			८६/१	०.२० आर
			९२/२	२.४३ हे.आर.

तरी वर नमुद प्रतिवादी यांना सुचित करणेत येते की, आपण वर नमुद केलेल्या मालमत्तेचा ताबा कायदेशीर पध्दतीने राष्ट्रसंत आचार्य आनंद ऋषीजी महाराज नागरी सहकारी पतसंस्था मर्या.संगमनेर या संस्थेकडे देण्याची कायदेशीर कारवाई करणेपूर्वी नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन आपला लेखी/तोंडी खुलासा **दिनांक १८/११/२०२६ रोजी दु.१२.०० वाजता उपनिबंधक सहकारी संस्था, संगमनेर, यशवंतराव चव्हाण प्रशासकीय भवन, तिसरा मजला, नविन नगर रोड, संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर** या कार्यालयात हजर राहावे. सदर दिवशी व वेळेत आपण हजर न राहील्यास अथवा लेखी म्हणणे आपण सादर न केल्यास कायद्यातील तरतुदीनुसार पुढील प्रस्तावित कारवाई पूर्ण करण्यात येईल.

ठिकाण :- संगमनेर
दिनांक :- ५/११/२०२६

(संतोष कोरे)
उपनिबंधक
सहकारी संस्था, संगमनेर

पाहिजेत

राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा

अकाऊंटंट- १ जागा
मार्केटिंग- २ जागा
दुकान कामासाठी - २ जागा

रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस दिला जाईल

ठिकाण- जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे,२ नं. गल्ली, संगमनेर

8669184141

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
०२४२५- २२५१२९

CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY OLD NAME
PRATIK DIPAK DAKE

NEW NAME AS
PRATIK DEEPAK DAKE

ADD - AT RAYATEWADI POST - WAGHAPUR TAL- SANGAMNER , DIST - AHMEDNAGAR

CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY OLD NAME
NAZEMA FAQIR MOHAMMED PEERZADE

NEW NAME AS
NAJEMA FAKIRMOHMMAD PIRJADE

ADD – GALANDE MALA , BHARAT NAGAR, SANGAMNER , TAL- SANGAMNER , DIST - AHMEDNAGAR

रिक्त पदे भरणे आहे

MYCITYHUB GLOBAL PRIVATE LIMITED, sangamner

- बिझनेस एक्झिक्युटिव्ह – ४
- कार्यालयीन प्रशासक – १
- आयटी प्रोफेशनल – १
- संगमनेर, अकोले तालुका प्रतिनिधी प्रत्येकी - १

पात्रता १२ वी किंवा पदवीधर, संगणक ज्ञानवेतन व इतर सुविधा २० ते २५ हजार+ इन्सेंटिव्ह

Contract -
mycityhubglobal@gmail.comMob- 9970473161

CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY OLD NAME
PRANALI ASHOK TAJANE

TO NEW NAME
PRANALI ASHOK TAJNE

BY AFFIDAVIT NO 1274/2026 DATE- 05/11/2026

ADD- GHULEWADI FATA, A/P GHULEWADITAL.SANGAMNER, AHILAYANAGAR,422608

पान १ वरून

राजहंस दूध ...

सद्या दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे चाऱ्याची व पाण्याची बिकट परिस्थिती निर्माण झालेली आहे. दूध उत्पादकांनी चाऱ्याचे नियोजन करणे गरजेचे आहे. दूध उत्पादकाच्या अडचणीच्या काळात संघाने सातत्याने मदत व सहकार्य केलेले आहे. शासनाने आपले स्तरावरून दुष्काळाचे नियोजन करणे गरजेचे असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. सहकारी चळवळ अधिक मजबूत करावयाची असल्यास दूध उत्पादकांनी सहकारी संघाला ताजे, स्वच्छ व निर्भेळ दुधाचा पुरवठा करावा व ग्राहकांनी देखील सहकारी दूध संघांनी निर्माण केलेले दर्जेदार व शुध्द राजहंस दुग्धजन्य पदार्थ खरेदी करावे असे अवाहन व्हा. चेअरमन मा. राजेंद्र पाटील चकोर यांनी केले. या प्रसंगी दूध संघाचे संचालक लक्ष्मणराव कुटे, विलासराव वर्पे, संतोष मांडेकर, विलास कवडे, बबनराव कुऱ्हाडे , बादशहा वाळुंज, संजय पोकळे, विक्रम थोरात, रमेश गुंजाळ, विष्णू ढोले, तुकाराम दातीर, रविंद्र रोहम, भारत मुंगसे, प्रमोद पाव से , सौ.प्रतिभाताई जोंधळे, श्रीमती मंदाताई नवले, कार्यकारी संचालक डॉ. सुजित खिलारी आदी उपस्थित होते.

बी.एस्सी. नर्सिंग (B.Sc. Nursing)
प्रवेश प्रक्रिया २०२६-२७
वामनराव इथापे नर्सिंग कॉलेज, संगमनेर

महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष (CET CELL), मुंबई यांच्या Notice No. 05, दिनांक 02/11/2026 नुसार भारतीय परिचर्या परिषद (INC) यांच्या सुधारित पात्रता निकषांनुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी बी.एस्सी. नर्सिंग प्रवेश प्रक्रियेसाठी पात्रता निकषांमध्ये सवलत देण्यात आली आहे.

सर्व प्रवर्गांसाठी सुधारित पात्रता निकष – शून्य पर्सेंटाइल (Zero Percentile). या सुधारणेनुसार नव्याने पात्र ठरलेल्या व यापूर्वी नोंदणी न केलेल्या इच्छुक विद्यार्थ्यांनी खालील वेळापत्रकानुसार प्रवेश प्रक्रियेत सहभागी व्हावे.

१. ऑनलाइन नोंदणीचे वेळापत्रक

अ.क्र.	प्रवेश प्रक्रियेचा तपशील	दिनांक व वेळ
१	ऑनलाइन नोंदणी व Session Apply	०३/११/२०२६ ते ०६/११/२०२६
२	नोंदणी शुल्क भरणे (Online Payment)	०३/११/२०२६ ते ०७/११/२०२६ (सायं. ५.०० वाजेपर्यंत)
३	आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे	०३/११/२०२६ ते ०७/११/२०२६ (रात्री ११.५९ वाजेपर्यंत)

२. संस्थास्तरीय प्रवेश फेरी – २ (Institute Level Round-2)

अ.क्र.	प्रवेश प्रक्रियेचा तपशील	दिनांक व वेळ
१	महाविद्यालयात प्रत्यक्ष अर्ज सादर करणे	०८/११/२०२६ ते १०/११/२०२६ (सायं. ५.३० वाजेपर्यंत)
२	निवड यादी प्रसिद्ध करणे	१०/११/२०२६
३	प्रथम निवड यादीतील विद्यार्थ्यांचा प्रवेश व मूळ कागदपत्रे जमा करणे	११/११/२०२६ ते १२/११/२०२६
४	द्वितीय निवड यादी प्रसिद्ध करणे	१२/११/२०२६
५	रिक्त जागांसाठी प्रवेश प्रक्रिया	१५/११/२०२६

महत्त्वाच्या सूचना

१. यापूर्वी ऑनलाइन नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा नोंदणी करता येणार नाही.
२. यापूर्वी नोंदणी न केलेले व सुधारित निकषांनुसार पात्र ठरलेले विद्यार्थीच नव्याने नोंदणी करू शकतात.
३. संस्थास्तरीय फेरी-२ साठी दिनांक २७/१०/२०२६ रोजी सायं. ५.३० वाजेपर्यंत जागा मिळालेले तसेच संस्थास्तरीय फेरी-१ मध्ये प्रवेश घेतलेले विद्यार्थी पात्र नाहीत.
४. प्रवेशासाठी आवश्यक सर्व मूळ कागदपत्रे व महाविद्यालयाचे निर्धारित शुल्क सादर करणे आवश्यक आहे.
५. प्रवेशाची अंतिम तारीख १५/११/२०२६ आहे.

इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेची संपूर्ण माहिती व मार्गदर्शनासाठी त्वरित महाविद्यालयाशी संपर्क साधावा.

वामनराव इथापे नर्सिंग कॉलेज, संगमनेर

टीप : प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र राज्य CET Cell यांच्या अधिकृत वेळापत्रक व नियमांनुसार राहील. जागा उपलब्धतेनुसार प्रवेश दिला जाईल.





प्रो. रु.
रजि. नं.

ॲड. बी. आर. राऊत
फौजदारी न्यायालय कोर्ट नं.४
संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर

जाहीर नोटीस

मे. ज्युडीशिअल मॅजीस्ट्रेट साहेब वर्ग १ संगमेर

क्रि. चौ.अर्ज नं. ७०१/२०२६ यांचे कोर्टात

भानुदास भिकाजी सांगळे ---- अर्जदार
विरुध्द
मा. ग्रामसेवक ---- सा. वाले
ग्रामपंचायत कार्यालय तिगाव

अर्जदार हा वरील ठिकाणची कायमस्वरुपी स्थायिक रहिवाशी असुन आहे. अर्जदार याची बहिण नामे शकुंतला भिकाजी सांगळे हिचा जन्म दि.०५/०६/१९७४ रोजी मौजे तिगाव, ता. संगमनेर, जि.अ. नगर येथे रहाते घरी झालेला असुन आहे. अर्जदार याचे बहिणीचे जन्माची नोद ग्रामपंचायत तिगाव ता. संगमनेर येथे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आढळत नाही. त्याप्रमाणे अर्जदार याने मे. फौजदारी न्यायालय, कोर्ट नं.४ यांचे कोर्टात कि.चौ.अ.नं.७०१/२०२६ हा अर्ज अर्जदार याने दि. ०५/०६/१९७४ रोजीचे जन्माची नोंद होणेकामी दाखल केला आहे.

सबब सदर नोटीसने कळविण्यात येते की, अर्जदार याची बहिण नामे शकुंतला भिकाजी सांगळे हिचा जन्म दि.०५/०६/१९७४ रोजी मौजे तिगाव, ता. संगमनेर, जि.अ.नगर येथे रहाते घरी झालेला असुन यासंदर्भात कोणाची काही हरकत असल्यास तशी लेखी अगर तोंडी हरकत सदर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून ३० दिवसांचे आत अथवा ता. २९.१४२/२६ रोजी सकाळी १०.३० वा. मे. न्यायालयात स्वतः हजर राहुन अथवा वकिलांमार्फत नोंदवावी, अन्यथा त्यांच्या जन्माच्या नोंदीच्या संदर्भात कोणतीही हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश केला जाईल.

हुकूमावरून
सह. अधिक्षक दिवाणी व फौजदारी
न्यायलय कोर्ट नं.४ संगमनेर

सही
तयार करणार

शिक्का

पाहिजेत

गरजू व अनुभवी साईट इंजिनीअर, सुपरवायझर व ऑफिस असीस्टंट पाहिजेत

- संपर्क -
चिंतामणी डेव्हलपर्स
7741057560

पाहिजेत

श्री मारूती देवस्थान माळी समाज पंच ट्रस्ट,
माळीवाडा, ता. संगमनेर

संस्थेसाठी व्यवस्थापक नेमणे आहे.

संगणक ज्ञान आवश्यक, निर्व्यसनी
9850387044
9623469373

पाहिजेत

ड्रायव्हर कम हेल्पर पाहिजे

आत्मशांती टी सेंटर
(सपट चहा)
नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

पाहिजेत

ड्रायव्हर - २ जागा
आकर्षक वेतन
अर्जासह समक्ष भेटणे
श्री बलदेव कन्स्ट्रक्शन
इनसाईड कांकरेज कॉर्नर
गणेशनगर, संगमनेर
- संपर्क -
8308015324

सिद्धार्थ एंटरप्राईजेस
कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड संगमनेर
पाहिजेत

एका नामांकित पेपर डिलिंग कंपनी करिता खालील **जागा भरणे आहे**

सेल्स एक्झीक्युटिव -१
एमबीए असल्यास प्राधान्य

ऑफिस असिस्टंट -१
कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक

कार ड्रायव्हर - १
अनुभव असल्यास प्राधान्य

अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

कामगार भरती

अकाउंटंट - ०१ (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक

सेल्समन- ०५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक

वॉचमन- ०१

ठिकाण – रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स
अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962

फ्लॅट विकणे आहे!

फ्लोरा टाउनशिप, घुलेवाडी निशिगंध अपार्टमेंटमध्ये पहिल्या मजल्यावरील तीन बाल्कनीचा प्रशस्त फ्लॅट विकणे आहे.
क्षेत्रफळ : १०२० चौ. फूट
कार पार्किंगची सुविधा
अपेक्षित किंमत : २७ लाख रुपये, किंमत वाटाघाटीनुसार ठरविण्यात येईल.
- संपर्क -
8379064040

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दुग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
We treat He cure's
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

संग्राम पतसंस्थेचा 'दीपोत्सव' उत्साहात

लॉकर सुविधा व सौर ऊर्जा प्रकल्पाचे उद्घाटन; कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस व भेटवस्तू



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संग्राम नागरी सहकारी पतसंस्था मर्या., संगमनेर यांच्या वतीने दिवाळीनिमित्त आयोजित 'दीपोत्सव' कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. राहुल शेवाळे यांनी हृदयाचे आरोग्य जपणे, हृदयरोगापासून बचाव, योग्य आहार व निरोगी जीवनशैली याविषयी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच संस्थेच्या लॉकर सुविधा व सौर पॅनल प्रकल्पाचे उद्घाटन संस्थेचे संस्थापक तथा जय हिंद लोकचळवळीचे संस्थापक डॉ. सुधीर तांबे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या सुविधांमुळे ग्राहकांना आधुनिक सेवा उपलब्ध होण्याबरोबरच संस्थेच्या पर्यावरणपूरक वाटचालीला चालना मिळणार आहे.

संस्थेचे प्रमुख अतिथि मा. महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात, डॉ. सुधीर तांबे, मा. आमदार सत्यजीतदादा तांबे, सौ. दुर्गाताई तांबे, डॉ. मैथिलीताई तांबे व डॉ. जयश्रीताई थोरात, चेअरमन श्री. राणीप्रसाद मुंदडा, व्हा. चेअरमन इंजि. विजय गिरी, श्री. बी. आर. चकोर, ड. सुहास आहेर व ड. बबन वामन आदी मान्यवरांच्या हस्ते अधिकारी व कर्मचाऱ्यांरी यांना दिवाळी बोनस व भेटवस्तू प्रदान करण्यात आल्या. यावेळी संस्थापक डॉ. सुधीरजी तांबे यांनी संस्थेच्या प्रगतीबद्दल संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांचे कौतुक करून सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत चेअरमन श्री. राणीप्रसाद मुंदडा यांनी केले. सूत्रसंचालन श्री. दत्तात्रय आरोटे व डॉ. सूचित गांधी यांनी केले, तर आभारप्रदर्शन व्हा. चेअरमन इंजि. विजय गिरी यांनी केले.

याप्रसंगी संस्थेचे संचालक डॉ. नाजिमुद्दीन शेख, श्री. विलास दिघे, डॉ. माणिकराव शेवाळे, श्री. सूर्यकांत शिंदे, श्री. नानासाहेब वर्पे, श्री. दत्तात्रय आरोटे, श्री. श्रीकांत कोकणे, श्री. सुदीप वाकळे, श्री. उमेश बोटकर, डॉ. सुचित गांधी, श्री. सोमेश्वर दिवटे, ड. प्रशांत गुंजाळ, सौ. सुलभाताई दिघे, सौ. सुनंदाताई दिघे, श्री. अनिल सातपुते, सी. ए. अमित कलंत्री आदी मान्यवरांसह संस्थेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आरोग्य जागृती, कर्मचारी कल्याण आणि आधुनिक सुविधांचा संगम साधत संग्राम पतसंस्थेने सामाजिक बांधिलकी व प्रगतीची परंपरा अधिक दृढ केली.

सातासमुद्रापार पोहोचणार मायदेशच्या फराळाचा गोडवा

आश्वी खुर्द पोस्ट ऑफिसमधून जर्मनीला दिवाळी फराळ रवाना

दिवाळी म्हणजे आनंदाचा, आपुलकीचा आणि नात्यांमधील गोडवा जपण्याचा सण. नोकरी, व्यवसाय आणि शिक्षणाच्या निमित्ताने अनेकजण परदेशात स्थायिक झाले आहेत. मात्र, हजारो किलोमीटर दूर असतानाही त्यांची ओढ असते ती मायदेशातील घरची, आईच्या हातच्या फराळाची आणि कुटुंबीयांच्या प्रेमाची. हाच प्रेमाचा गोडवा आता भारतीय डाक विभागाच्या माध्यमातून सातासमुद्रापार पोहोचणार आहे.

आश्वी खुर्द येथील रहिवासी श्री. हौशीराम गायकवाड यांनी जर्मनी येथे स्थायिक असलेल्या आपल्या मुला-जावयासाठी घरचा दिवाळी फराळ आश्वी खुर्द उपडाकघरातून आंतरराष्ट्रीय स्पीड पोस्टद्वारे पाठविला. ग्रामीण भागातील पोस्ट ऑफिसमधूनच परदेशात फराळ पाठविण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले. पूर्वी आंतरराष्ट्रीय पार्सल पाठविण्यासाठी शहरातील मोठ्या पोस्ट ऑफिसमध्ये किंवा खासगी कुरिअर सेवेकडे जावे लागत असे. मात्र, भारतीय डाक विभागाने आंतरराष्ट्रीय स्पीड पोस्ट सेवेचा विस्तार ग्रामीण भागापर्यंत केला आहे. आता उपडाकघरांसह शाखा डाकघरांमधूनही आंतरराष्ट्रीय टपाल बुकिंगची सुविधा उपलब्ध झाली आहे. त्यामुळे परदेशात राहणाऱ्या आपल्या प्रियजनांना घरचा फराळ, भेटवस्तू आणि इतर वस्तू पाठविणे अधिक सोयीचे झाले आहे.

याबाबत माहिती देताना आश्वी खुर्दचे सब पोस्टमास्तर अमोल गवांदे म्हणाले की, ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांतील मुले-मुली शिक्षण, नोकरी व व्यवसायानिमित्त अमेरिका, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, कॅनडा यांसारख्या देशांत स्थायिक आहेत. त्यांच्या कुटुंबीयांना घरचा फराळ व भेटवस्तू पाठविण्यासाठी आता तालुक्याच्या ठिकाणी जाण्याची आवश्यकता नाही. ग्रामीण पोस्ट ऑफिसमधूनही आंतरराष्ट्रीय स्पीड पोस्टची सुविधा उपलब्ध झाली असून नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा. खासगी कुरिअरच्या तुलनेत भारतीय डाक विभागाचे वाजवी दर, विश्वासार्ह सेवा, ऑनलाइन ट्रॅकिंग आणि मोफत पिकअप यांसारख्या सुविधांमुळे नागरिकांना आंतरराष्ट्रीय टपाल सेवा अधिक सोयीची ठरत आहे. विशेष म्हणजे, श्रीरामपूर विभागातील प्रत्येक उपडाकघर तसेच शाखा डाकघरात आंतरराष्ट्रीय टपाल बुकिंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय श्रीरामपूर प्रधान डाकघर येथे नुकतीच विशेष पार्सल पॅकेजिंगची सुविधाही सुरू करण्यात आली आहे. याबाबत श्रीरामपूर विभागाचे डाक अधीक्षक उमेश जनवाडे यांनी ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांनी भारतीय डाक विभागाच्या या सुविधांचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.



दिवाळीच्या निमित्ताने घरापासून दूर असलेल्या मुला-मुलींपर्यंत आईच्या हातच्या फराळासोबत प्रेम, माया आणि आठवणी पोहोचविण्याचे काम भारतीय डाक विभाग करीत आहे. त्यामुळे यंदाची दिवाळी केवळ घराघरांतच नव्हे, तर सातासमुद्रापारही फराळाच्या गोडव्याने साजरी होणार आहे.

एसटी कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट !

१० हजार रुपये सानुग्रह अनुदान; महागाई भत्त्यातही २ टक्के वाढ



मुंबई (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) तब्बल ८३ हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड करण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. एसटी कर्मचाऱ्यांना प्रत्येकी १० हजार रुपये सानुग्रह अनुदान, पात्र कर्मचाऱ्यांना १२ हजार ५०० रुपये सण उचल आणि महागाई भत्त्यात दोन टक्के वाढ करण्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ५ नोव्हेंबर २०२६ रोजी केली. या निर्णयामुळे एसटी कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

एसटी महामंडळातील विविध कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत आयोजित बैठकीत हा निर्णय जाहीर करण्यात आला. कर्मचाऱ्यांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्याच्या उद्देशाने सरकारने हा दिलासादायक निर्णय घेतला आहे.

एसटी महामंडळ सध्या आर्थिक अडचणींचा सामना करत असले, तरी कर्मचाऱ्यांच्या सणाचा आनंद हिरावून घेता येणार नाही, अशी ठाम भूमिका परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी मांडली. ते म्हणाले, एसटीचे अधिकारी आणि कर्मचारी अहोरात्र मेहनत घेऊन लाखो प्रवाशांना सुरक्षित आणि विश्वासार्ह प्रवाससेवा देतात. त्यांच्या कष्टाची आणि योगदानाची जाणीव ठेवून सानुग्रह अनुदान देणे हा त्यांचा हक्क आहे. कर्मचाऱ्यांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, यासाठी शासन कटिबद्ध आहे.

या निर्णयामुळे एसटी महामंडळावर सुमारे १६० कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. मात्र, कर्मचाऱ्यांच्या हिताला प्राधान्य देत शासनाने हा भार स्वीकारण्याची तयारी दर्शविली आहे.

याशिवाय, कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५८ टक्क्यांवरून ६० टक्के करण्यात येणार असून, पात्र कर्मचाऱ्यांना १२ हजार ५०० रुपयांची सण उचलही मिळणार आहे. त्यामुळे आर्थिक दिलासा मिळण्यासोबतच सणासुदीच्या काळात कर्मचाऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या पाठबळामुळे एसटी महामंडळाचे भविष्य उज्ज्वल असल्याचा विश्वासही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

राज्य सरकारच्या या निर्णयामुळे एसटी कर्मचाऱ्यांच्या दिवाळीत आनंदाची भर पडली असून, त्यांच्या मेहनतीला आणि सेवाभावाला शासनाने दिलेली ही महत्त्वपूर्ण पावती मानली जात आहे.

ठाकरवाडीचा पाणीप्रश्न अखेर मार्गी

महिलांची पाण्यासाठीची भटकंती थांबली



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी गावांतर्गत असलेल्या वांदरकडा येथील ठाकरवाडीमध्ये गेल्या वर्षभरापासून भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता. वाडीतील नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याचा एकमेव आधार असलेल्या बोअरवेलची मोटार जळाल्याने पाणीपुरवठा पूर्णपणे बंद झाला होता. त्यामुळे विशेषतः महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी भटकंती करावी लागत होती. ऐन दुष्काळात पाण्यासाठी होणाऱ्या या हालअपेष्टांमुळे ग्रामस्थ त्रस्त झाले होते.

ही गंभीर समस्या सोडविण्यासाठी पांडुरंग काळे यांच्यासह स्थानिक महिलांनी शिवसेनेचे तालुकाप्रमुख रामभाऊ राहणे यांची भेट घेऊन आपली व्यथा मांडली. गेल्या वर्षभरापासून बोअरवेलची मोटार बंद असल्याने पिण्याच्या पाण्यासाठी करावी लागणारी धावपळ आणि महिलांना सहन करावा लागणारा त्रास त्यांनी निदर्शनास आणून दिला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन रामभाऊ राहणे यांनी तातडीने आमदार अमोल खताळ यांच्याशी संपर्क साधत ठाकरवाडीतील पाणीटंचाईची सविस्तर माहिती दिली.

आमदार खताळ यांनी या प्रश्नाची तातडीने दखल घेत प्रशासकीय स्तरावर पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांतून बोअरवेलसाठी नवीन मोटार मंजूर करून ती बसविण्यात आली. त्यामुळे वर्षभरापासून बंद असलेला बोअरवेल पुन्हा सुरू झाला असून ठाकरवाडीतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. महिलांची पाण्यासाठी होणारी पायपीट थांबल्याने ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. एकीकडे तालुक्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली असताना ठाकरवाडीतील ग्रामस्थांना वेळेवर पाणी उपलब्ध करून देण्यासाठी झालेल्या या प्रयत्नांचे नागरिकांनी स्वागत केले आहे.

केवळ तक्रारीची वाट न पाहता लोकप्रतिनिधी आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांनी समन्वयातून प्रश्न सोडविल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. ऐन दुष्काळात पाणीप्रश्न सोडवून दिलासा दिल्याबद्दल आमदार अमोल खताळ, गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, प्रशासक सरपंच, ग्रामविकास अधिकारी, शिवसेना तालुकाप्रमुख रामभाऊ राहणे, अंकुश राहणे, श्याम राहणे, संजय राहणे आणि हरिभाऊ राहणे यांचे वांदरकडा ठाकरवाडीतील ग्रामस्थांनी आभार मानले.

पान १ वरून

गोकुळमध्ये ...

गोकुळवर सत्ता मिळवता आली नाही, म्हणून तुम्ही तुमची सगळी तत्त्वे बाजूला ठेवणार आणि 'लोकशाही वाचवा' म्हणून मोर्चे काढणार. सध्या महाराष्ट्रात पाण्याचा भीषण दुष्काळ आहे आणि त्याचवेळी भारतीय जनता पक्षात समजूतदारपणाचाही भीषण दुष्काळ आहे. हे दोन्ही दुष्काळ एकाच वेळी कसे यावेत, याचेच आश्चर्य वाटते!

राज ठाकरे म्हणाले, हे सत्तेत असतानाच 'लोकशाही वाचवा' म्हणून मोर्चे काढतील आणि स्वतःच लोकशाहीचा गळा आवळतील. यांच्या काळात अतिरेकी हल्ले झाले, कायदा-सुव्यवस्था बिघडली, तरी 'दहशतवादापासून देश वाचवा' यासाठी हेच मोर्चे काढतील. देशाची अर्थव्यवस्था गाळात गेली आहे, म्हणून आता 'अर्थव्यवस्था वाचवा' यासाठी पण हेच मोर्चे काढतील. राज ठाकरे यांनी शेवटी भाजपला सडेतोड सल्ला दिला. भारतीय जनता पक्षाने हा रडीचा डाव खेळणे आता बंद करावे.

शेतकऱ्यांच्या बांधावर शिवसेना डॉक्टर्स सेलची माणूसकीची दिवाळी

शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर फुलले आनंदाचे हास्य



युवावार्ता (प्रतिनिधी)

शहापूर - दिवाळीचा खरा आनंद हा केवळ दिव्यांच्या रोषणाईत आणि फराळाच्या गोडव्यात नसून, समाजातील गरजू घटकांच्या आयुष्यात आनंदाचा प्रकाश निर्माण करण्यात आहे. याच सेवाभावी आणि सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून शिवसेना डॉक्टर्स सेल, ठाणे प्रदेशच्या वतीने शाहापूर तालुक्यातील दुर्गम ग्रामीण भागातील पाड्यांवर राहणाऱ्या शेतकरी बांधवांना दिवाळी शिधा वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. शेतकऱ्यांच्या थेट बांधावर जाऊन दिवाळीचा आनंद वाटल्याने या उपक्रमाला माणुसकीची अनोखी किनार लाभली. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या आदेशानुसार, प्रदेश सरचिटणीस डॉ. जे. बी. भोर, प्रदेशाध्यक्ष डॉ. धनंजय पडवळ आणि महिला प्रमुख डॉ. समिधा गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

शहरातील सुखसोयींपासून दूर असलेल्या दुर्गम भागातील शेतकरी कुटुंबांना दिवाळीच्या सणात आनंदाचे क्षण अनुभवता यावेत, त्यांच्या घरात सणाचा गोडवा निर्माण व्हावा आणि त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलावे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. पहाटेच शिवसेना डॉक्टर्स सेलच्या टीमने दुर्गम भागाकडे प्रस्थान करत शेतकऱ्यांच्या शेताच्या बांधावर जाऊन त्यांची भेट घेतली. यावेळी दिवाळी शिधा देऊन त्यांना सणाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. निसर्गाच्या लहरीपणाशी, आर्थिक संकटांशी आणि शेतीतील अनिश्चिततेशी संघर्ष करणाऱ्या शेतकरी बांधवांसाठी हा उपक्रम केवळ शिधा वाटपापुरता मर्यादित न राहता आपुलकी, सहानुभूती आणि सामाजिक जिव्हाळा व्यक्त करणारा ठरला. मदतीचे साहित्य स्वीकारताना शेतकरी कुटुंबांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे हास्य हेच या उपक्रमाचे खरे यश असल्याची भावना सहभागी डॉक्टरांनी व्यक्त केली.

या उपक्रमात शिवसेना डॉक्टर्स सेल, ठाणे प्रदेशचे डॉ. जे. बी. भोर, डॉ. प्रशांत जाधव, डॉ. राजीव शिंदे, डॉ. उत्तम भोर, डॉ. विठ्ठल कराळे, डॉ. संतोष जोशी, डॉ. विनायक अत्रे, डॉ. पेरुमल कोणार आणि डॉ. शिरीष टिंगरे यांनी सक्रिय सहभाग घेतला. सर्व सहकाऱ्यांच्या एकजुटीने आणि सेवाभावी योगदानामुळे हा उपक्रम यशस्वी झाला. राजकारण हे केवळ पद, सत्ता आणि प्रसिद्धीपुरते मर्यादित नसून, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून त्याच्या सुख-दुःखात सहभागी होणे, हाच लोकसेवेचा खरा अर्थ असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

स्वतःच्या घरात दिवा लावणे हा सण असतो; मात्र दुसऱ्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करणे ही खरी माणुसकी असते, या भावनेतून शिवसेना डॉक्टर्स सेलने राबविलेला हा उपक्रम सामाजिक संवेदनशीलतेचा आदर्श ठरला. शेतकरी सुखी तर समाज समृद्ध, या भावनेतून सेवा, समर्पण आणि माणुसकीचा संदेश देत शिवसेना डॉक्टर्स सेल, ठाणे प्रदेशच्या वतीने सर्व शेतकरी बांधवांना सुखसमृद्धीच्या आणि मंगलमय दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी उपक्रमात सहभागी होण्याची संधी दिल्याबद्दल सर्व वरिष्ठ नेतृत्वाचे आभार डॉ. प्रशांत जाधव, प्रदेश सचिव, शिवसेना डॉक्टर्स सेल यांनी व्यक्त केले.

दिव्यांगांचे कै. शिवाजी खुळे यांच्या स्मरणार्थ 'दिव्यांग भवन' उभारावे - दिव्यांग सेना

संगमनेर (प्रतिनिधी)

दिव्यांग बांधवांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आयुष्यभर संघर्ष करणारे दिव्यांगांचे नेते स्वर्गीय शिवाजी संभाजी खुळे यांच्या स्मरणार्थ संगमनेर नगरपरिषदेच्या हद्दीत सर्व सोयी-सुविधांनी युक्त असे भव्य 'स्वर्गीय शिवाजी संभाजी खुळे दिव्यांग भवन' उभारण्यात यावे, अशी आग्रही मागणी शिवसेना दिव्यांग सहाय्य सेना, अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व नगराध्यक्षा यांना निवेदन देण्यात आले आहे. स्वर्गीय शिवाजी संभाजी खुळे हे दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांची जाण असलेले कर्तृत्ववान, चाणाक्ष आणि दूरदृष्टीचे नेतृत्व होते. दिव्यांगांना समाजात सन्मानाने जगता यावे, त्यांच्या हक्कांना न्याय मिळावा, शासनाच्या विविध योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचावा आणि त्यांच्या समस्या मार्गी लागाव्यात, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. दिव्यांग समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेले कार्य प्रेरणादायी असून त्यांच्या स्मृती चिरंतन जतन करण्याची भावना दिव्यांग बांधवांमध्ये आहे.

संगमनेर शहर व तालुक्यातील दिव्यांग बांधवांना एकत्र येण्यासाठी, त्यांच्या समस्या मांडण्यासाठी तसेच सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी स्वतंत्र हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होणे आवश्यक आहे. यासाठी नगरपरिषद हद्दीत दिव्यांग भवन उभारणे गरजेचे असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रस्तावित दिव्यांग भवनामध्ये स्वतंत्र सभागृह, शासकीय योजनांची माहिती व मार्गदर्शन केंद्र, दिव्यांग संघटनांसाठी स्वतंत्र कार्यालयीन जागा, प्रशिक्षण व रोजगार मार्गदर्शन सुविधा, दिव्यांगांसाठी सुलभ स्वच्छतागृह, रॅम्प तसेच सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांसाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. एखाद्या व्यक्तीच्या स्मृती जतन करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांनी ज्या समाजासाठी आयुष्यभर संघर्ष केला, त्या समाजाच्या हितासाठी कायमस्वरूपी सुविधा निर्माण करणे होय. स्वर्गीय शिवाजी संभाजी खुळे यांच्या नावाने दिव्यांग भवन उभारल्यास त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव होईल. त्यामुळे संगमनेर नगरपरिषदेने या मागणीचा सहानुभूतीपूर्वक व सकारात्मक विचार करून आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करावी आणि दिव्यांग भवन उभारण्यास मंजुरी द्यावी, अशी विनंती शिवसेना दिव्यांग सहाय्य सेना, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष यांच्या वतीने करण्यात आली आहे. या निवेदनावर जिल्हाध्यक्ष जालिंदर लहामगे, आनंदराव खरात, अमित डहाळे, अनिल अमले, भगवान भोईर यांच्यासह अनेकांच्या सह्या आहेत.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
कमी वेदना, जलद बरे होणे
लेझर व प्रगत तंत्रज्ञान
अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

अंजनी होम अप्लायन्सेस सर्व्हिस
प्रो.प्रा दिपक दुस्सा
Mo. 9970256292
7588540906
तत्काळ दुरुस्ती सेवा | चांगल्या प्रतिची हमी | योग्य दरात सेवा | घरी येऊन दुरुस्ती
आमच्या कडे सर्व प्रकारच्या घरगुती वापरातील वस्तु मिक्सर, फॅन,गॅस,गिझर,गॅस शेगडी,भट्टी इतर वस्तु विक्री व दुरुस्ती करुन मिळेल.
अकोलकर कॉम्प्लेक्स, दिवेकर गॅस समोर मालदाड रोड, संगमनेर

खांबा गावाच्या जलसिंचन योजनेच्या चौकशी करणार

आ. अमोल खताळ संतप्त, ठेकेदारावर कायदेशीर कारवाईच्या सूचना



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्याच्या पठारभागातील खांबा गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी मुळा धरणातून सुमारे सहा किलोमीटर अंतरावरून पाणी आणण्याच्या उद्देशाने कामधेनू उपसा जलसिंचन योजना मंजूर करण्यात आली आहे. मात्र, या योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी आमदार अमोल खताळ यांच्याकडे केल्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत आमदार खताळ यांनी जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले. तसेच, जमिनीत गाडलेली संपूर्ण पाइपलाइन उकरून प्रत्यक्ष कामाचा दर्जा तपासण्याचे स्पष्ट निर्देश दिले. कामात अनियमितता आढळल्यास संबंधित ठेकेदार कंपनीविरोधात कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

खांबा गावासाठी सन २०२४ मध्ये सुमारे १६ कोटी रुपये खर्चाची कामधेनू उपसा जलसिंचन योजना मंजूर करण्यात आली. मात्र, गेल्या दीड ते दोन वर्षांपासून या योजनेचे काम सुरू असूनही अद्याप पूर्णत्वास गेलेले नाही. त्यामुळे कामाच्या दर्जाबाबत आणि विलंबाबाबत ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.योजनेच्या कामाची पाहणी करताना संबंधित पाइपलाइनचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे ग्रामस्थांनी आमदार खताळ यांच्या निदर्शनास आणून दिले. पाइपलाइनच्या कामातील त्रुटींबाबत ग्रामस्थांनी प्रत्यक्ष परिस्थिती दाखवत आपली भूमिका मांडली. तसेच, जलसंधारण विभागाला कोणतीही पूर्वकल्पना न देता संबंधित ठेकेदाराने पाइपलाइनचे काम जमिनीत बुजवून टाकल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला. या तक्रारींची दखल घेत आमदार खताळ यांनी केवळ वरवरची पाहणी करून चालणार नाही, तर प्रत्यक्ष कामाची सत्य परिस्थिती समोर आली पाहिजे, अशी भूमिका घेतली. संबंधित ठेकेदाराने जमिनीत गाडलेली संपूर्ण पाइपलाइन उकरून काढावी आणि तिच्या कामाचा दर्जा तपासून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, असे निर्देश त्यांनी जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. योजनेच्या कामाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला.

कामात हलगर्जीपणा किंवा नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधित ठेकेदाराविरुद्ध रीतसर कायदेशीर कारवाई करावी. तसेच, पाइपलाइनच्या कामासाठी वापरण्यात येणारी यंत्रसामग्री जप्त करण्याबाबतही आवश्यक ती कारवाई करावी, अशा सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. या वेळी जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता पांडुरंग गायसमुद्रे, कनिष्ठ अभियंता सनी पगार आणि शाखा अभियंता शुभम गाडेकर उपस्थित होते. आता आमदार खताळ यांच्या निर्देशानंतर संबंधित विभागाकडून काय कारवाई केली जाते आणि ठेकेदारावर कोणती कारवाई होते, याकडे खांबा ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

अकार्यक्षम अधिकारी, कर्मचारी, डॉक्टर आरोग्यमंत्र्यांच्या रडारवर!

आरोग्य संवाद यात्रेच्या पहिल्याच दिवशी नांदेडमध्ये ११ जणांवर कारवाई

युवावार्ता (प्रतिनिधी)

नांदेड -राज्यातील आरोग्य यंत्रणेतील अकार्यक्षमता आणि बेजबाबदारपणाविरोधात आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. आरोग्य संवाद यात्रेच्या पहिल्याच दिवशी नांदेड जिल्ह्यात आरोग्यसेवेतील त्रुटी आणि कामातील हलगर्जीपणा आढळल्याने ११ जणांवर कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत. यामध्ये डॉक्टरांसह विविध अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा समावेश असल्याने आरोग्य विभागात मोठी खळबळ उडाली आहे.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर सध्या राज्यातील विविध जिल्ह्यांचा आरोग्य संवाद यात्रेच्या माध्यमातून दौरा करत आहेत. या यात्रेदरम्यान जिल्हा आणि तालुका स्तरावरील शासकीय दवाखाने, रुग्णालये तसेच आरोग्य विभागाच्या कामकाजाचा प्रत्यक्ष आढावा घेतला जात आहे. केवळ कागदोपत्री अहवालांवर विसंबून न राहता आरोग्यसेवेची वास्तविक परिस्थिती जाणून घेण्यावर मंत्र्यांनी भर दिला आहे.

नांदेड जिल्ह्यातील लोहा, मुखेड, हिमायतनगर आणि सोनखेड या भागांतील विविध आरोग्य संस्थांना भेटी दिल्यानंतर आरोग्य यंत्रणेतील अनेक त्रुटी समोर आल्या. रुग्णांना अपेक्षित आरोग्यसेवा देण्यात अपयश, कामातील हलगर्जीपणा आणि प्रशासकीय अकार्यक्षमता आढळल्याने मंत्री आबिटकर यांनी संबंधितांवर तातडीने कारवाईचे निर्देश दिले.

या कारवाईत सहा डॉक्टर, दोन आयडीडब्ल्यू इंजिनिअर, राष्ट्रीय आरोग्य अभियानातील दोन डीपीएम अधिकारी आणि दोन तालुका आरोग्य अधिकारी यांचा समावेश असल्याचे वृत्त आहे. याशिवाय १० जणांच्या कामकाजाची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले असून, चौकशीत दोषी आढळल्यास तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. तसेच चार जणांच्या तातडीने बदलीचे आदेश देण्यात आल्याने आरोग्य विभागातील कामचुकार अधिकारी-कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.



आरोग्यमंत्र्यांच्या या धडक कारवाईमुळे राज्यातील आरोग्य विभागात जबाबदारी आणि कार्यक्षमतेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. शासकीय रुग्णालयांमध्ये रुग्णांना वेळेवर आणि दर्जेदार उपचार मिळणे, आरोग्य यंत्रणेतील प्रत्येक घटकाने आपली जबाबदारी पार पाडणे, यासाठी मंत्री आबिटकर यांनी कठोर पवित्रा घेतल्याचे दिसून येत आहे. नांदेडमधील कारवाईनंतर आरोग्य संवाद यात्रेच्या पुढील दौऱ्यात ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या जाणार आहेत, तेथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची पूर्वतयारी सुरू झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. रुग्णालयांतील व्यवस्था, कर्मचारी उपस्थिती, औषधसाठा आणि आरोग्यसेवेचा दर्जा याबाबत प्रशासनाकडून विशेष दक्षता घेतली जात असल्याची चर्चा आहे.

आरोग्यमंत्र्यांच्या या धडक मोहिमेमुळे शासकीय आरोग्य यंत्रणेतील अकार्यक्षमता आणि बेजबाबदारपणाला आळा बसेल, तसेच सर्वसामान्य रुग्णांना अधिक सक्षम आणि दर्जेदार आरोग्यसेवा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आरोग्य संवाद यात्रा ही केवळ आढावा बैठक न राहता कामचुकार यंत्रणेला वठणीवर आणणारी मोहीम ठरणार का, याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड , तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

जोर्वे गावातील अवैध वाळू उपसा थांबवा, ग्रामस्थांची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)-

संगमनेर - विद्यमान सत्ताधाऱ्यांच्या मर्जीने जोर्वे परिसरातील नदीच्या पात्रातून अहोरात्र बेसुमार व विनापरवाना अवैध वाळू उपसा राजरोसपणे सुरू आहे. यामुळे परिसरात दादागिरी व दहशत वाढली असून तातडीने ही बेसुमार अवैध वाळू उपसा थांबवून या अवैध धंद्यामागे असणाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी अशी आग्रही मागणी जोर्वे ग्रामस्थांनी तहसीलदार व प्रांताधिकारी यांना निवेदन देऊन केली आहे.

प्रांताधिकारी अरुण उंडे व तहसीलदार धीरज मांजरे, पोलीस निरीक्षक यांना ग्रामस्थांच्या वतीने शरद नाना थोरात, विठ्ठल काकड, अनिल बाळासाहेब दिघे ,संजय निवृत्ती थोरात, बादशहा बोरकर, पी.वाय दिघे, दिगंबर इंगळे, प्रमोद इंगळे ,भाऊसाहेब दिघे ,राजू थोरात ,धनंजय दिघे आदींसह विविध ग्रामस्थांनी निवेदन दिले. या निवेदनात म्हटले आहे की जोर्वे परिसरातील प्रवरा नदीच्या पात्रातून अहोरात्र बेसुमार व विनापरवाना अवैध वाळू उपसा राजरोसपणे सुरू आहे



आणि या प्रकाराकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे परिसरातील गावांना पिण्याचे पाणी पुरवणाऱ्या ग्रामपंचायतच्या सार्वजनिक विहिरींच्या जवळच खड्डे पडल्याने विहिरींना धोका निर्माण झाला आहे याचबरोबर पाण्याची रासायनिक प्रदूषण विहिरीत दारूच्या बाटल्या आढळून येत आहेत.अशा प्रकारांमुळे दहशत व गुन्हेगारी वाढत चालली आहे.

स्थानिक प्रशासन हे हसेबाजी मध्ये अडकले असून याला प्रशासनाची मुख सहमती आहे. या प्रचंड वाळू उपसा मुळे पर्यावरणाचा मोठा ऱ्हास होत असून जेसीबी व पोकलंडच्या साह्याने नदी खोदली जात आहे. या वाळू उपसा बरोबर अवैध दारू विक्रीचेही प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून या सर्व अवैध वाळू उपसावर तातडीने कारवाई करावी अन्यथा उपोषणाचा मार्ग अवलंबनातील असा इशारा त्यांनी दिला.

यावेळी बोलताना थोरात म्हणाले की बेसुमार होत असलेल्या वाळू उपसामुळे पर्यावरणाच्या ऱ्हासाबरोबर सामाजिक संतुलन बिघडले चालले आहे.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165



कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
सर्जरी विभाग
• अतिदक्षता विभाग
• अपघात विभाग
डायलिसीस विभाग
• सुपर स्पेशालिटी विभाग
• न्यूरोविभाग
हृदयरोग विभाग
• मेडिसीन विभाग
• अद्ययावत कॅथलॅब
जॉईंट रिप्लेसमेंट
• स्पाईन सर्जरी
• मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.)
Physician & Anasthhetist

डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.)
Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25

धनत्रयोदशी : समृद्धी, आरोग्य आणि संस्कृतीचा मंगलमय संगम

भारतीय परंपरा जपताना पर्यावरणपूरक दिवाळीचा संकल्प करण्याची गरज



भारतीय संस्कृतीत सण–उत्सवांना अनन्यसाधारण महत्त्व असून, प्रत्येक सणामागे श्रद्धा, परंपरा आणि जीवनमूल्यांचा अनमोल ठेवा दडलेला आहे. दीपावलीच्या मंगलमय पर्वाची सुरुवात करणारी धनत्रयोदशी हा केवळ धन–संपत्तीच्या पूजनाचा दिवस नसून, आरोग्य, सुखसमृद्धी आणि निसर्गसंवर्धनाचा संदेश देणारा सण आहे. भगवान धन्वंतरी पूजन, लक्ष्मी–कुबेर आराधना आणि नवीन वस्तूंच्या खरेदीच्या परंपरेतून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडते. बदलत्या काळात या परंपरांचे महत्त्व जपत पर्यावरणपूरक आणि सामाजिक बांधिलकी जपणारी दिवाळी साजरी करण्याचा संकल्प करणे, हीच धनत्रयोदशीची खरी शिकवण आहे.



भारतीय संस्कृतीत सण-उत्सवांना केवळ धार्मिक महत्त्व नसून, त्यामागे जीवनमूल्ये, आरोग्यविषयक विचार, सामाजिक एकोपा आणि निसर्गाशी नाते जपण्याची शिकवणही दडलेली आहे. दीपावलीच्या मंगलमय पर्वाची सुरुवात धनत्रयोदशीपासून होते. आश्विन महिन्यातील कृष्ण पक्षातील त्रयोदशीला साजरा होणारा हा सण धन, समृद्धी, आरोग्य आणि मांगल्याचे प्रतीक मानला जातो. या दिवशी भगवान धन्वंतरी यांचे पूजन, लक्ष्मी-कुबेराची आराधना, नवीन वस्तूंची खरेदी आणि घरात दीपप्रज्वलन करण्याची परंपरा आहे.

धनत्रयोदशी म्हणजे केवळ सोने-चांदी किंवा नवीन वस्तू खरेदी करण्याचा दिवस नव्हे, तर आपल्या जीवनातील खऱ्या संपत्तीचे महत्त्व समजून घेण्याची संधी आहे. पैसा आणि भौतिक साधनांबरोबरच उत्तम आरोग्य, कुटुंबातील आनंद, मानसिक समाधान, परस्परांतील प्रेम आणि सामाजिक बांधिलकी यांनाही जीवनात तितकेच महत्त्व आहे, हा संदेश या सणातून मिळतो. आधुनिक काळात बदलत्या जीवनशैलीच्या पार्श्वभूमीवर धनत्रयोदशीच्या परंपरांचा अर्थ समजून घेत त्यातील सकारात्मक मूल्ये जपणे आवश्यक आहे.

धन्वंतरी पूजनातून आरोग्याचे महत्त्व अधोरेखित

धनत्रयोदशीचे धार्मिक महत्त्व भगवान धन्वंतरी यांच्या पूजनाशी जोडलेले आहे. हिंदू धार्मिक परंपरेनुसार भगवान धन्वंतरी हे आयुर्वेद आणि आरोग्याचे अधिष्ठाता मानले जातात. समुद्रमंथनातून भगवान धन्वंतरी अमृतकलश घेऊन प्रकट झाल्याची पौराणिक कथा प्रचलित आहे. त्यामुळे या दिवसाला धन्वंतरी जयंती असेही म्हटले जाते. अनेक ठिकाणी या दिवशी धन्वंतरी पूजन करून कुटुंबाच्या उत्तम आरोग्यासाठी आणि निरोगी जीवनासाठी प्रार्थना केली जाते.

भारतीय संस्कृतीत आरोग्याला सर्वोच्च स्थान देण्यात आले आहे. निरोगी शरीर आणि प्रसन्न मन हीच आनंदी जीवनाची खरी पायाभरणी आहे. संपत्ती, प्रतिष्ठा आणि भौतिक सुखसुविधा असूनही आरोग्य चांगले नसेल, तर जीवनातील आनंद अपूर्ण राहतो. त्यामुळे धनत्रयोदशीचा दिवस आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करणारा मानला जातो. आजच्या धावपळीच्या जीवनात अनियमित दिनचर्या, व्यायामाचा अभाव, ताणतणाव आणि चुकीच्या आहाराच्या सवयी यांमुळे विविध आरोग्यविषयक समस्या निर्माण होऊ शकतात. अशा परिस्थितीत धन्वंतरी पूजनाचा संदेश केवळ धार्मिक विधीपुरता मर्यादित न ठेवता निरोगी जीवनशैली अंगीकारण्याच्या संकल्पाशी जोडता येईल. संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, स्वच्छता आणि आवश्यकतेनुसार वैद्यकीय सल्ला घेणे या गोष्टींना प्राधान्य देणे महत्त्वाचे आहे. आयुर्वेद ही भारताची प्राचीन आरोग्यपरंपरा आहे. या परंपरेचा अभ्यास करताना वैज्ञानिक दृष्टिकोन, योग्य वैद्यकीय मार्गदर्शन आणि उपचारांच्या सुरक्षिततेलाही महत्त्व दिले पाहिजे. धनत्रयोदशीच्या निमित्ताने आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करणे, रक्तदान, आरोग्य तपासणी शिबिरे आणि जनजागृती उपक्रमांना प्रोत्साहन देणे, हीदेखील या दिवसाच्या संदेशाला साजेशी कृती ठरू शकते.

लक्ष्मी-कुबेर पूजन आणि खरेदीच्या परंपरेतून समृद्धीचा संकल्प

धनत्रयोदशीच्या दिवशी देवी लक्ष्मी आणि धनाचे देवता मानले जाणारे कुबेर यांचे पूजन करण्याची परंपरा अनेक कुटुंबांत प्रचलित आहे. देवी लक्ष्मी ही संपत्ती, ऐश्वर्य, सौभाग्य आणि समृद्धीचे प्रतीक मानली जाते, तर कुबेर यांना धनाचे रक्षक मानण्याची धार्मिक धारणा आहे. या दिवशी घराची स्वच्छता करून प्रवेशद्वार सजविणे, रांगोळी काढणे, दिवे लावणे आणि श्रद्धेनुसार पूजा करणे, अशा प्रथा पाळल्या जातात. धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर सोने-चांदी, नवीन भांडी, धातूच्या वस्तू किंवा घरासाठी आवश्यक वस्तू खरेदी करणे शुभ मानले जाते. काळानुसार या परंपरेत बदल झाले असून, आज अनेक नागरिक इलेक्ट्रॉनिक वस्तू, वाहने आणि इतर उपयोगी वस्तूंचीही खरेदी करतात. काही कुटुंबे आपल्या आर्थिक क्षमतेनुसार प्रतीकात्मक स्वरूपात एखादी छोटी वस्तू खरेदी करून हा दिवस साजरा करतात. मात्र, खरेदी करणे हे प्रत्येकासाठी बंधनकारक नसून, श्रद्धा आणि परंपरा आपल्या परिस्थितीनुसार जपता येतात.

या सणाला आर्थिक शिस्तीची जोड देणेही आवश्यक आहे. समृद्धी म्हणजे केवळ अधिक पैसा खर्च करणे नव्हे, तर मिळालेल्या उत्पन्नाचा योग्य वापर करणे, बचतीची सवय लावणे आणि गरजेनुसार खर्चाचे नियोजन करणे होय. सणासुदीच्या काळात आकर्षक सवलती आणि जाहिरातींमुळे अनेकदा अनावश्यक खरेदी होऊ शकते. त्यामुळे वस्तूंची गुणवत्ता, किंमत आणि गरज लक्षात घेऊन निर्णय घेणे हिताचे ठरते.

धनत्रयोदशीच्या काळात बाजारपेठांमध्ये होणारी खरेदी स्थानिक व्यापारालाही चालना देऊ शकते. सराफ व्यावसायिक, भांडी विक्रेते, कपड्यांची दुकाने, मिठाई विक्रेते, कुंभार, फुलविक्रेते आणि छोटे उद्योजक यांच्यासाठी हा महत्त्वाचा काळ असतो. स्थानिक दुकानदारांकडून खरेदी करणे, महिला बचत गटांच्या उत्पादनांना प्रोत्साहन देणे आणि स्थानिक कारागिरांच्या वस्तू वापरणे यांमुळे समाजातील विविध घटकांना आर्थिक आधार मिळू शकतो. धन-संपत्तीचे पूजन करताना प्रामाणिकपणा, कष्ट, बचत, दानशीलता आणि सामाजिक जबाबदारी यांसारख्या मूल्यांचेही स्मरण ठेवणे गरजेचे आहे. आपल्या समृद्धीचा उपयोग कुटुंबाच्या उन्नतीसोबतच गरजूंच्या मदतीसाठी केला, तर या सणाचा अर्थ अधिक व्यापक होईल.

पर्यावरणपूरक दिवाळी : परंपरेसोबत निसर्गाचेही जतन

दिवाळीचा सण म्हणजे प्रकाश, आनंद, स्वच्छता आणि उत्साह. मात्र, सण साजरा करताना पर्यावरणाचे संतुलन राखणे ही काळाची गरज बनली आहे. फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण, प्लास्टिकच्या सजावटीच्या वस्तूंचा वाढता वापर तसेच कचऱ्याची अयोग्य विल्हेवाट यांमुळे पर्यावरणावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे धनत्रयोदशीपासूनच पर्यावरणपूरक दिवाळीचा संकल्प करणे आवश्यक आहे. पारंपरिक मातीच्या पणत्या वापरणे, शक्य तिथे ऊर्जा बचत करणारी विद्युत रोषणाई निवडणे, पुनर्वापर करता येणाऱ्या सजावटीच्या वस्तूंचा वापर करणे आणि प्लास्टिकचा अनावश्यक वापर टाळणे, अशा छोट्या कृतींमधून पर्यावरण संवर्धनाला हातभार लावता येतो. फटाक्यांचा वापर मर्यादित ठेवणे, ध्वनिप्रदूषणाबाबत जागरूक राहणे आणि लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच प्राण्यांच्या सुरक्षिततेचा विचार करणेही महत्त्वाचे आहे.

दिवाळीच्या काळात घरातील अनावश्यक वस्तू बाजूला काढून त्यांचा योग्य पुनर्वापर करणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि कचऱ्याचे वर्गीकरण करणे, या सवयी समाजासाठी उपयुक्त ठरतात. त्याचबरोबर गरजू कुटुंबांना कपडे, अन्नधान्य किंवा जीवनावश्यक वस्तू देणे, वृद्धाश्रम आणि अनाथालयांमध्ये आनंद वाटणे तसेच सामाजिक संस्थांच्या उपक्रमांत सहभागी होणे यांमुळे सणाला संवेदनशीलतेची जोड मिळते. भारतीय सणांचे वैशिष्ट्य म्हणजे परंपरा आणि सामूहिक आनंद. त्यामुळे धार्मिक विधी करताना पर्यावरणाची काळजी घेणे, स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देणे आणि समाजातील प्रत्येक घटकाचा विचार करणे, यातून दिवाळीचा खरा आनंद अधिक अर्थपूर्ण होऊ शकतो. धनत्रयोदशी हा संपत्तीच्या पूजनासोबत आरोग्य, कुटुंब, संस्कृती आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व अधोरेखित करणारा सण आहे. धन्वंतरी पूजनातून निरोगी जीवनाचा, लक्ष्मी-कुबेर पूजनातून समृद्धीचा आणि पर्यावरणपूरक दिवाळीतून निसर्गसंवर्धनाचा संदेश मिळतो. या परंपरांचा आधुनिक जीवनाशी समतोल साधत, आर्थिक शिस्त जपत आणि इतरांच्या आनंदात सहभागी होत धनत्रयोदशी साजरी केली, तर हा सण खऱ्या अर्थाने मंगलमय ठरेल. प्रत्येकाच्या जीवनात उत्तम आरोग्य, सुख, समृद्धी आणि समाधान नांदो, हीच या पवित्र पर्वानिमित्त सदिच्छा.

